# महाराष्ट्रातील ऊर्जा साधनसंपत्ती

▶ महाराष्ट्रातील प्रमुख ऊर्जा साधने :-

① दगडी कोळसा
② जलविद्युत
③ औष्णिक विद्युत
④ खनिज तेल व नैसर्गिक वायु
⑤ अणुविद्युत
⑥ अपरंपरागत ऊर्जा साधनसंपत्ती

## ① दगडी कोळसा :-

① अँथ्रासाइट - [ 92 ते 98 टक्के कार्बन ]
② बिट्युमिनस - [ 75 ते 90 % ]
③ लिग्नाइट - [ 76 % ]
④ पीट - [ 50 ते 60 % ]

▶ महाराष्ट्रातील जिल्हे - नागपुर, गडचिरोली, यवतमाळ

▶ महाराष्ट्रातील साठे - 5,000 दशलक्ष टन

▶ महाराष्ट्रातील एकूण प्रमाण - 4 %

▶ महाराष्ट्रातील सर्व दगडी कोळसा हा बिट्युमिनस आहे.

▶ महाराष्ट्रातील दगडी कोळशाच्या सर्वात मोठा साठा बल्लारपुर (चंद्रपुर जिल्ह्यात) येथे आहे.

### ⊛ कोळशाची पुढील तीन क्षेत्र :-

① वैनगंगा खोरे - नागपुर जिल्ह्यातील कामठी, उमरेड, पाटणसावंगी
② वर्धा खोरे - बांदर, वरोडा, बल्लारपुर, दुर्गापुर, वणी, घुग्घुस
③ यवतमाळ व चंद्रपुर जिल्ह्याचा एकोकांच्या सीमावर्ती भाग - कुंभुम - तेलवासा, मारली - राजुरा, मांजरी

▶ दगडी कोळशाचे उपयोग :-

① महाराष्ट्रातील दगडी कोळशाचे उत्पादन उपयोग राज्यातील औष्णीक केंद्रे (खापरखेडा, बल्लारपूर, पारस) यांच्याप्रमाणे उद्योगधंदे व रेल्वेसाठी केला जातो.

② प्रोड्युसर नावाच्या जळणाच्या वायू निर्माण करण्यासाठी काही कोळसा वापरता येण्यासारखा आहे तर काही कोळशाचे कार्बनीकरण करून कोक, इंधन, वायू, हलके तेल, अमोनियम सल्फेट इ. पदार्थ मिळवता येतात.

▶ दगडी कोळशाचे उत्पादन :-

▶ 1961 साली दगडी कोळशाचे उत्पादन 8,56,000 टन होते. ते 1982 साली 75,93,000 टन झाले तर 2000 साली 27,696,000 टन झाले.

▶ याचाच अर्थ, सन 2000 च्या सुमार सुमारे वीस वर्षांत कोळशाच्या उत्पादनात तिप्पट वाढ झालेली होती.

▶ 2017-18 साली कोळशाचे उत्पादन 422.18 लाख टन होते.

② जलविद्युत :-

① कोयना जलविद्युत केंद्र :-

▶ कोयना जलविद्युत केंद्रास 'अर्वाचीन महाराष्ट्राची भाग्यरेषा' असे म्हटले जाते.

▶ महाराष्ट्रातील आण्विक, औष्णीक, व जलविद्युत केंद्रामधून निर्माण होणारी वीज एकत्र करून संपूर्ण राज्यात विद्युत जाळे उभारले आहे.

▶ चौथा टप्पा पूर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर जगामधील 'भूगर्भातील जलविद्युत प्रकल्पात' कोयनेचे स्थान अग्रेसर राहील.

- कृष्णा नदीची उपनदी कोयना असुन तीचा उगम महाबळेश्वर होतो.
- हेळवाकजवळील 'देशमुखवाडी' येथे कोयना नदीवर धरण बांधुन पाणी अडविले आहे.
- या धरणामुळे विस्तृत जलाशय निर्माण झालेला असुन 'शिवसागर' या नावाने ओळखला जातो.
- धरणाजवळ एक मोठा डोंगर आहे. या डोंगराच्या पुर्वेच्या बाजुने कोयना नदी वाहते. या मोठ्या बोगद्यातुन पुर्वेकडचे पाणी पश्चिमेला नेले आहे.
- चिपळुन तालुक्यातील पोफळी येथे डोंगराच्या पायात एक प्रचंड वीज केंद्र उभारले आहे.
- कोयनेच्या पश्चिम भागात सुमारे 457 मी. ते 548 मी. म्हणजे 91 मी. उंचीची एक टेकडी असुन त्या ठिकाणी धबधबा आहे.
- शिवसागर जलाशयातील पाणी 4km लांबीची बोगद्यात सोडले जाते. तेथे टर्बाईन्स व जनित्रे असुन वीजनीर्मिती केली जाते.
- पोफळीची विद्युतनिर्मिती क्षमता 560 मेगावॅट आहे.
- कोयना विजेच्या आधारेच मुंबई - पुणे औद्योगिक पट्ट्यांचा विकास झालेला आहे.
- कोयना जलविद्युत प्रकल्पाची विद्युतनिर्मिती क्षमता 1920 मेगावॅट आहे. (यामध्ये पोफळी (560 मेगावॅट), अलोरे (320 मेगावॅट), धरण पायथा (40 मेगावॅट), लांबटवाडी (1000 मेगावॅट) अशी विद्युतक्षमता आहे.